# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पवित्र मरियेचे स्वर्गनयन सोहळा – स्वातंत्र्यदिन

## १५ ऑगस्ट २०२४ - श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या मातेला तू सर्वकाळ पापांच्या कलंकापासून दूर ठेवलेस आणि तिला शरीरासहीत स्वर्गात घेतलेस. तिच्या स्वर्गनयनाच्या सोहळयाप्रसंगी आम्ही करीत असलेल्या प्रार्थना तू स्वीकाराव्यात म्हणून आम्ही तुला विनंती करतो.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, बिशप, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना आपले पाळकीय कार्य करण्यास पवित्र मरियेच्या मध्यस्थीने चांगले मानसिक व शारीरिक आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. प्रभूने आपल्या देशातील राज्यकर्त्यांना तसेच जनतेला आशीर्वादित करावे, आपली लोकशाही प्रणाली अधिक विकसित करावी, देशाचा सर्वांगिण विकास घडून सर्वांना सुखा समाधानाचे व शांतीचे जीवन जगता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र मरिया नम्रतेचे व पावित्र्याचे जीवन जगली म्हणून तिला स्वर्गनयनाचा बहुमान मिळाला. तिचा आदर्श डोळयासमोर ठेवून आपणास चांगले जीवन जगण्यास प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारे तसेच आपले स्वातंत्र्य अबाधीत ठेवण्यासाठी त्याग करणा-या सर्वांच्या आत्म्यांना चिरकाल शांती मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. सर्व स्त्रियांना विशेष करून ज्या स्त्रियांचे मानसिक व शारीरिक शोषण केले जाते अशांना परमेश्वराने त्याच्या विशेष कृपेने संपन्न करावे, त्यांना योग्य न्याय मिळावा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, पवित्र मरियेला स्वर्गनयनाचा बहुमान देऊन तिचा उचित सन्मान केल्याबद्दल आम्ही तुझी स्तुती करतो. आम्हाला नेहमी पापांपासून दूर ठेव. तुझ्या पुत्राशी विश्वासू राहून एक दिवस स्वर्गात तुझा गौरव करण्याचे भाग्य आम्हाला दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.